MHND100008262021

दाखल दिनांक : २१.०६.२०२१
नोंदणी दिनांक : २१.०६.२०२१
निकाल दिनांक : ०७.०४.२०२६
कालावधी : ०४ वर्षे, ०९ महिने, २६ दिवस

**सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कंधार, जिल्हा नांदेड**
**यांचे न्यायालयात**

( पिठासीन अधिकारी के.एस.खंडारे )

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ८९/२०२१** **निशाणी क्रमांक - ३६**

**प्रतिदावा वादी**

१. शेख जमाल पि. शेख फत्तु,
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती,
रा. नागलगाव, ता.कंधार, जि.नांदेड

२. भगवान पि. कामाजी ढवळे,
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती,
रा. सिध्दार्थनगर, कंधार, ता.कंधार, जि.नांदेड

३. उत्तम पि. कामाजी ढवळे,
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती,

४. गौतम पि. कामाजी ढवळे,
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती,

५. संजय पि. कामाजी ढवळे,
वय : ४० वर्षे, धंदा : शेती,

६. जनाबाई भ्र. कामाजी ढवळे,
वय : ६५ वर्षे, धंदा : घरकाम,

७. सुमनबाई भ्र. लक्ष्मण माचलवाड,
वय : ३८ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. सुमेधनगर , ता. कंधार जि. नांदेड

८. विजयमाला भ्र. कचरू गायकवाड,
वय : ३७ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. शिरूर , ता. मुखेड जि. नांदेड

९. नागीन भ्र. भगवान कांबळे,
वय : २८ वर्षे, धंदा : शेती,
रा. सूमेधनगर कंधार ता. कंधार जि. नांदेड

१०. ललिता भ्र. रमेश भद्रे,
वय : ३५ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. शिरूर ता. मुखेड जि. नांदेड

**विरूद्ध**

**प्रतिदावा प्रतिवादी** १. गयाबाई भ्र. माधव गायकवाड,
वय : ७५ वर्षे, धंदा : शेती,
रा. नागलगाव, ता.कंधार, जि.नांदेड
ह.मू.भिमनगर, कंधार, ता.कंधार, जि.नांदेड

२. शंकर पि. संभाजी गायकवाड,
वद : ५५ वर्षे, धंदा : शेती,
रा. हतईपुरा, कंधार, ता.कंधार, जि.नांदेड

**<u>प्रतिदावा</u> - <u>मालकी घोषणा व चिरकालीन मनाई हुकूम मिळण्याकरीता</u>....**

---

प्रतिदावा वादीचे वकील - श्री. यू.पी.वाघमारे ,
प्रतिदावा प्रतिवादी क्र.१ व २ - श्री. जी.पी.गवाले,

---

## <u>न्या य नि र्ण य</u>

**(पारित दिनांक १७ एप्रिल , २०२६)**

प्रतिदावा वादीने प्रस्तुतचा प्रतिदावा हा शेत सर्वे नं.३२/१ (गट नं. १९४), क्षेत्र ४१ आर आणि शेत सर्वे नं.३२/३ (गट नं. १९२), क्षेत्र ३४ आर हे मौजा. नागलगाव, ता.कंधार, जि.नांदेड (यानंतर सदर जमीनीस वाद जमीन असे संबोधण्यात येईल) चे मालक घोषीत करून त्यामध्ये अडथळा व आडकाठी करू नये असा चिरकालीन मनाई हूकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे**.**

**२.** प्रतिदावा वादीचे कथन खालील प्रमाणे आहे :-
वादजमीन दिनांक १५.०३.१९९१ ला वाद जमीन प्रतिदावा वादी क्र. २ ते

१० च्या वडीलांनी खरेदीखत दस्त क्रमांक ६०९/१९९१ प्रमाणे विकत घेतलेले आहे.त्यांच्या वडीलांच्या निधनानंतर महसूल विभागात प्रतिदावा वादी क्र. २ ते १० ची नोंद फेरफार क्र. ११९३ नूसार वारसा हक्काने झालेली आहे. वाद जमीनीचे प्रतिदावा वादी हे मालक व कब्जेदार आहेत. प्रतिदावा प्रतिवादी यांचा वाद जमीनीशी वाद जमीनीशी कूठलाही संबंध नाही. वाद दावा प्रतिवादी यांनी सदरचा दावा दाखल करून प्रतिदावा वादी यांची मालकी नाकारली व त्यांच्या वाद जमीनीवरील ताब्यास आक्षेप घेतला आहे. त्यामूळे प्रतिदावा वादी यांना सदरचा प्रतिदावा दाखल करणे भाग पडले आहे.

**३.** त्यांच्याविरूद्ध दिनांक ११-०१-२०२३ रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारित करून सदरचा प्रतिदावा त्यांच्याविरूद्ध विनालेखी बयाण चालविण्यात आले.

**४.** प्रतिदावा प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाखल केलेला सदरचा दावा दिनांक ०३-१२-२०२४ रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारित करून खारीज करण्यात आलेला आहे.

**५.** प्रतिदावा व वाद कथन, संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे न्याय देण्याकरीता उदभवले असून त्यावर मी माझे निष्कर्ष त्यापुढे दिलेल्या कारणमिमांसेआधारे नोंदविले ते येणे प्रमाणे :-

| **अ.क्र.** | **<u>मुददे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १ | प्रतिदावा वादी क्र. २ ते १० हे दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार असल्याचे शाबीत करतो काय ? | **होकारार्थी** |
| २. | प्रतिदावा वादी क्र. २ ते १० हे दावा मिळकतीवर प्रतिदावा प्रतिवादी यांनी हरकत अडथळा केल्याचे शाबीत करतो काय ? | **होकारार्थी** |
| ३ | प्रतिदावा वादी क्र. २ ते १० हे विनंती केल्याप्रमाणे प्रतिदावा प्रतिवादी विरुद्ध निरंतर मनाई हूकूम व मालकी घोषीत करण्यास पात्र आहेत काय ? | **होकारार्थी** |
| ५ | अंतीम आदेश व हुकम काय ? | **प्रतिदावा अंतीम आदेशाप्रमाणे मंजूर.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**६.** वादीने खालील प्रमाणे साक्षीदार तपासले आहेत :-

१. गौतम कामाजी ढवळे (वा.सा.क्र.१), निशाणी क्र.२४

२. शेख जमाल शेख फत्तू (वा.सा.क्र.२), निशाणी क्र.३१

दिनांक २९-११-२०२५ रोजी निशाणी क्र. ३५ वर पुरवा बंद पूरसिस दाखल करून प्रतिदावा वादींने पूरावा बंद केला.

**७.** वादीने त्याच्या मौखीक पुराव्याच्या पुष्ठयार्थ खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अ.क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | फेरफार क्र. १८ | निशाणी क्र.२५ |
| २. | फेरफार क्र. ११९३ | निशाणी क्र.२६ |
| ३. | एकत्रित केलेल्या जमीनी दर्शवणारे पत्रक | निशाणी क्र.२७ |
| ४. | गाव नमुना आठ अ | निशाणी क्र.२८ |
| ५ | भूमापन क्र. १९२ चा सातबारा उतारा | निशाणी क्र.२९ |
| ६. | भूमापन क्र. १९४ चा सातबारा उतारा | निशाणी क्र.३० |
| ७. | खरेदीखत क्रमांक १७६१/१९९० | निशाणी क्र. ३२ |
| ८. | खरेदीखत क्रमांक १७६२/१९९० | निशाणी क्र. ३३ |
| ९. | खरेदीखत क्रमांक ६०९/१९९१ | निशाणी क्र. ३४ |

**८.** प्रतिदावा वादीचे विद्वान वकील श्री. यू.पी.वाघमारे यांनी असा यूक्तीवाद केला की, वादीने त्याच्या पूराव्याचे शपथपत्र दाखल करुन दाव्यातील कथनाप्रमाणे साक्ष दिलेली आहे. सदर प्रतिदावा विनालेखी बयाण चालविण्यात आलेला आहे. तसेच वादीच्या

उलटतपासामध्ये त्यांच्या साक्षीवर अविश्वास ठेवण्यायोग्य कोणतीही बाब प्रतिदावा प्रतिवादी ने उलटतपास घेतला नसल्याने अभिलेखावर आणलेली नाही. प्रतिदावा वादीचे साक्षीदार यांचा उलटतपास घेतला नसल्याने प्रतिदावा वादीचे कथन अविवादीत आहे. त्यांच्या अभिलेखावरील पूराव्यावरुन ते वादजमीन चे नोंदणीकृत खरेदीखता द्वारे मालक व कब्जेदार असल्याचे सिद्ध होते. तसेच प्रतिदावा प्रतिवादी यांनी जाणून बूजून खोटा दावा दाखल करून प्रतिदावा वादी यांची मालकी नाकारून व ताब्यास आक्षेप घेवून त्यांच्या ताब्यास अडथळा केला हे प्रतिदावा वादीने सिद्ध केले आहे. एकंदरीत पाहता प्रतिदावा वादीने त्यांचा प्रतिदावा पूराव्यानिशी सिद्ध केले असल्याने प्रतिदावा मंजूर होणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्रमांक १ ते ४ बाबत -**

**९.** पुरावा व वस्तूस्थितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर मुद्दे मी एकत्रीतपणे विचारात घेत आहे.

**१०.** **गौतम** (वा.सा.क्र.१) यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.२४ वर दाखल केली असून, त्यामध्ये त्याने प्रतिदाव्यामध्ये केलेल्या वादकथनाचा पुनरउच्चार केलेला आहे.

**११**. शेख जमाल (वा.सा.क्र.२) यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.३१ वर दाखल केली असून, त्यामध्ये त्याने प्रतिदाव्यामध्ये केलेल्या वादकथनाचा पुनरउच्चार केलेला आहे.

**१२.** **प्रतिदावा** वादीच्या ताब्यामध्ये हस्तक्षेप करण्यापासून प्रतिदावा प्रतिवादीला विरूद्ध कायमस्वरुपी मनाई हूकूमाच्या दाव्यात, प्रतिदावा वादीला हे शाबीत करावे लागेल की, प्रतिदाव्याच्या तारखेनूसार तो वाद जमीनीच्या कायदेशीर ताब्यात होता आणि प्रतिवादीने हस्तक्षेप करण्याचा किंवा त्रास देण्याचा प्रयत्न केला.

**१३.** भारतीय पूरावा कायदा चे कलम १०१ प्रमाणे ज्याला त्याने ठामपणे सांगीतलेल्या तथ्यांच्या पुराव्यावर अवलंबून असलेल्या कोणत्याही कायदेशीर अधिकार व उत्तरदायित्वाचा निर्णय दयावा अशी इच्छा असेल, त्याने ती तथ्य अस्तिवात असल्याचे सिद्ध केले पाहिजे. जेव्हा एखादी व्यकती कोणत्याही वस्तूस्थितीचे अस्तित्व सिद्ध करण्यास बांधील असते, तेव्हा असे म्हटले जाते की, पुराव्याचा भार हा त्या व्यकीवर असतो. म्हणून सदर प्रकरणामध्ये हे पूराव्याचे ओझे हे प्रतिदावा वादीवर आहे.

**१४.** गौतम (वा.सा.क्र.१) यांनी वादजमीनीवर त्याचा ताबा असल्याचे व ते

वारसा हक्काने वाद जमीनीचे मालक असल्याचे शपथेवर पूराव्यात सांगीतलेले आहे. शेख जमाल (वा.सा.क्र.२) यांचा पूरावा देखील त्यांच्या साक्षीस पूरक व सुसंगत आहे.

**१५.** गौतम (वा.सा.क्र.१) यांच्या कथनास पुरक म्हणून अभिलेखावर दाखल खरेदीखत दस्त क्रमांक ३४ वरून वाद जमीन प्रतिदावा वादी क्र. २ ते १० च्या वडीलांनी सन १९९१ मध्येच विकत घेतल्याची सिद्ध होते. तसेच अभिलेखावरील इतर दस्त निशाणी क्र. २५ ते ३० या महसूल दस्तावरून प्रतिदावा वादी यांचा वाद जमीनीवर ताबा असल्याचे देखील सिद्ध होते. गौतम (वा.सा.क्र.१) व शेख जमाल (वा.सा.क्र.२) यांचा प्रतिदावा प्रतिवादी यांनी उलटतपास घेतला नसल्याने त्यांचा पूरावा अभिलेखावर विनाआव्हानीत आहे. प्रतिदावा वादींच्या पूराव्यावरून व अभिलेखावरील दस्तावरून ते प्रतिदावा वादजमीनीचे मालक व कब्जेदार असल्याचे सिद्ध होते आणि त्यांचा दावा शक्य वाटतो. म्हणून मुद्दा क्र.१ व ४ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ०५ बाबत :-**

**१६.** मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या कारणमिमांसे प्रमाणे प्रतिदावा वादीने त्याचा प्रतिदावा पुराव्यानिशी सिद्ध केलेला असल्याने मुद्दा क्र.५ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिदावा वादीचा प्रतिदावा मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिदावा वादी क्र .२ ते १० हे वादजमीनीचे मालक व कब्जेदार असल्याचे घोषीत करण्यात येते.

३. प्रतिदावा प्रतिवादी यांना चिरकालीन मनाई हूकूमाद्वारे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी वाद जमीनीवरील प्रतिदावा वादी क्र. २ ते १० यांच्या ताब्यास कूठल्याही प्रकारचा हरकत अडथळा करू नये.

४. येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करावा.

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE

Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.04.17 15:45:43 +0530

दिनांक १७.०४.२०२६

( के.एस.खंडारे)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कंधार.